| MHKO200001432022 | **नियमीत दिवाणी दावा क्रं.४२/२०२२ मधील**<br>**नि.क्रं.५७ खालील आदेश**<br>**मानसिंग आनंदा पाटील**<br>**विरुध्द**<br>**सावित्री उर्फ अनुसया गुंडू कापसे वगैरे** |
|---|---|

वादी यांनी सदरचा दावा खरेदीपत्र रद्द होवुन मिळणेकरिता व कायम मनाईकरीता तसेच मृत्यूप्रमाणपत्राप्रमाणे हकक्ज्ञापन होवुन मिळणेकरिता दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी क्रं.२ व ३ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ७ नियम ११ प्रमाणे दावा नामंजूर करावा यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी अर्जामध्ये असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरूद्ध खरेदीपत्र रद्द होवुन मिळणेकरीता, हक्कज्ञापनाकरीता व कायम मनाईकरीता दाखल केलेला असुन सदर दावेचे कामी कलम १ मध्ये वर्णन केलेल्या गट नं.१९ या मिळकतीबाबत प्रतिवादी नं.१ व ४ यांचेमध्ये झालेले खरेदीपत्र दस्त क्र.१३८६/२०१९ हा रद्दबातल जाहीर होवुन मिळणेबाबत वादींनी त्यांचे दावेचे विनंती कलम–१७ (इ) मध्ये मागणी केलेली आहे. वादी यांनी दावेचे कलम–११ मध्ये खरेदी दस्त रद्दबातल जाहीर होवुन मिळणेकरीता केलेली आकारणी ही चुकीची नमुद केलेली आहे, कारण वादी जो खरेदीदस्त रद्द करून मागणी करतात त्या खरेदीदस्तातील मोबदला हा रक्कम रू.९,७५,०००/– इतका आहे, परंतु वादी यांनी आकारणी मध्ये रक्कम रु.४,८७,५००/– इतकी चुकीची किंमत नमुद करून दाव्याची आकारणी केलेली असुन त्यावर अयोग्य व चुकीचा स्टॅम्प जोडलेला आहे. वादींनी जाणिवपुर्वक चुकीची आकारणी करून मे. न्यायालयाचे अधिकारक्षेत्राबाहेरील दावा दाखल केलेला आहे. वास्तविक सदरचा दावा दाखल झालेनंतर तत्कालीन मा. सहाय्यक अधिक्षक यांनी देखील दावा तपासताना त्याबाबत कार्यालयीन आक्षेप घेणे गरजेचे होते परंतु तसा आक्षेप घेतलेला दिसुन येत नाही.

**०३.** प्रतिवादी क्रं.२ व ३ यांचे पुढे असे कथन आहे की, वादींनी दावा दाखल करताना बॉम्बे कोर्ट फी ॲक्ट तरतुदींचे पालन केलेले नाही व सदर कायदयाचे कलम ६(एच ए) प्रमाणे खरेदी दस्तातील नमुद मोबदल्याचे मुल्यांकन दावेचे आकारणीमध्ये करून

त्यावर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प दिल्याखेरीज प्रस्तुतचा दावा चालणेस पात्र नसल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–७ नियम–११ प्रमाणे वादींचा दावा खारीज करण्यास पात्र आहे. सबब, वादींनी दावा मिळकत कलम–१७(इ) मध्ये केलेल्या मागणीकरीता योग्य ती आकारणी दावा कलम–११ मध्ये नमुद करण्याचे आदेश दयावेत व तसे वादीने न केल्यास वादींचा दावा सी.पी.सी. ऑर्डर– ७रूल–११ प्रमाणे नामंजुर करण्यात यावा अशी प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

**०४.** वादी यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे दाखल करुन हरकत घेतली की, प्रस्तुत अर्जातील मजकुर खोटा, चुकीचा असुन तो वादींना मान्य व कबुल नाही. वादी यांचे म्हणणे असे आहे की, प्रतिवादी यांनी कायदयातील तरतुदींचा विर्पथारक अर्थ काढून सदरचा अर्ज दाखल केला असलेने तो कायदयानेच चालणेस पात्र नाही. प्रस्तुत दावा वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांनी लिहुन दिलेले खरेदीपत्र रद्दबातल होवून मिळणेसाठी असलेने त्याकरिता कोर्ट फि ॲक्ट प्रमाणे आवश्यक असलेला स्टॅम्प जमा केलेला आहे. प्रतिवादी यांनी हे केवळ सदरचे काम चालविणेस विलंब व्हावा या हेतुने अर्ज दाखल केला असलेने सदरचा अर्ज नामंजुर व्हावा अशी विनंती वादी यांनी केली.

**०५.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रतिवादी यांची सदर अर्जातील कथने खोडून काढणेसाठी त्यांचे म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी दावा दाखल करताना योग्य ती मुद्रांक शुल्क भरला असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जाद्वारे बॉम्बे कोर्ट फी ॲक्ट, कलम ६(एच ए) प्रमाणे खरेदी दस्तातील नमुद मोबदल्याचे मुल्यांकन दावेचे आकारणीमध्ये करून त्यावर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प दिल्याखेरीज प्रस्तुतचा दावा चालणेस पात्र नसल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–७ नियम–११ प्रमाणे वादींचा दावा खारीज करण्याची मागणी केली आहे. दाव्यातील कथने, प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे कैफियतीमधील कथने व अभिलेखावरील कागदपत्रांची पाहणी केली असता, असे दिसुन येते की, दावेचे कामी कमल १ मध्ये वर्णन केलेल्या गट नं.१९ या मिळकतीबाबत प्रतिवादी नं.१ ते ३ व प्रतिवादी क्रं.४ यांचेमध्ये झालेले खरेदीपत्र दस्त क्र.१३८६/२०१९ हा रद्दबातल जाहीर होवुन मिळणेबाबत वादींनी त्यांचे दावेचे विनंती कलम–१७ (इ) मध्ये मागणी केलेली असुन त्याकरिता त्यांनी महाराष्ट्र कोर्ट फी

कायदा कलम ६(४)(एच.ए.जे.) नुसार आवश्यकत तो कोर्ट फी स्टॅम्प भरला आहे. तसेच वादी यांनी रद्दबातल करुन मागणी केलेला खरेदीपत्र दस्त क्र.१३८६/२०१९ मध्ये वादी हे पक्षकार असल्याचे दिसत नाही, त्यामुळे वादी यांनी कलम ६(एच ए) प्रमाणे खरेदी दस्तातील नमुद मोबदल्याचे मुल्यांकन दावेचे आकारणीमध्ये करून कोर्ट फी स्टॅम्प देणेची आवश्कता नाही. सबब, वादी यांनी त्यांच्या दाव्यातील विनंतीनुसार केलेल्या मागणीच्या अनुषंगाने दाव्याचा मुद्रांक शुल्क भरल्याचे दिसून येत असल्यामुळे तसेच वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Date: 2025.09.16 17:38:49 +0530

( व्ही.ए.लावंड–कोकाटे )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळे–खेरीवडे.

कळे–खेरीवडे
दि.१६.०९.२०२५.